# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

---

**दिनांक १३.०९.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**गुन्हेशाखा युनिट क्र. १ व ३ ची कामगिरी :– जिवे ठार मारणारे आरोपी ४ तासाचे आत ताब्यात.**

दिनांक १३.०९.२०२६ चे ०२.०० वा. ते ०२.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा पोलीसांना पोलीस ठाणे तहसील हद्दीत, खापरी मोहल्ला, धारस्कर रोड, कसार भवन समोरील अमितचे चहा टपरीचे आत एक अज्ञात इसमाचा रक्ताने माखलेला मृतदेह मिळाल्याची माहिती प्राप्त झाली. घटनास्थळी भेट दिलेल्या गुन्हेशाखेचे वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हेशाखा युनिट क्र. १ व ३ चे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन अनोळखी मृतदेहाची ओळख पटवून मृतकाचे नाव मनिष चंद्रशेखर मोहीते वय ३८ वर्ष रा. प्लॉट क्र. ५७९/ए, नागपुर नाईट स्कुल, गजानन मंदीरजवळ, कोतवाली, नागपूर असे निष्पन्न केले. तसेच सदर गुन्हयाचे तपासात न्याटग्रिड, सिंबा तसेच एआय या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन तसेच तपास पथकांमध्ये समन्वय ठेऊन गुन्हयातील आरोपी असलेले मृतकाचे मित्र आरोपी नामे १) निखिल उर्फ रुषभ धर्मेंद्र चव्हाण वय २५ वर्ष रा. लकडापुल पोलीस चौकी मागे, लकडगंज, नागपूर २) कुणाल अनिलराव झाडे वय ३० वर्ष रा. चितारओळी, बडकस चौक, महाल, कोतवाली, नागपूर व ३) विनय यशवंतराव पौनीकर वय ३५ वर्ष रा. इतवारी सिटी पोस्ट ऑफीस, वारसकर रोड, खापरीपुरा, नागपूर यांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न करुन त्यांचा शोध घेऊन आरोपी क्र. २ व ३ यांना पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतुन तसेच आरोपी क्र. १ यास पोलीस ठाणे लकडगंज हद्दीतुन ताब्यात घेतले. आरोपींना विचारपुस केली असता, त्यांनी जुने भांडणाचे कारणावरुन संगनमत करुन मृतकास शस्त्राने व दगडाने मारहाण करुन जिवानिशी ठार केले अशी कबुली दिली. फिर्यादी रोशन उर्फ गोलु चंद्रशेखर मोहीते वय ३६ वर्ष रा. प्लॉट क्र. ५७९/ए, नागपुर नाईट स्कुल, गजानन मंदीरजवळ, कोतवाली, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन, पोलीस ठाणे तहसील येथे आरोपीविरुध्द कलम १०३(१),३(५) भान्यासं. अन्वये गुन्हा दाखल केला करण्यात आला असून तिन्ही आरोपींना तहसील पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. श्री प्रशांत ठवरे, श्री अतुल मोहनकर, सपोनि राजाभाऊ जाधव, पोउपनि मधुकर काठोके, ओमप्रकाश कोठे, सफौ. संतोष ठाकूर, ईश्वर खोरडे, पोहवा. मनोज नेवारे, विजय श्रीवास, अजय पाटील, दिनेश डवरे, प्रितम यादव, योगेश वासनिक, पोअं. रोहीत काळे, दिपक दासरवार, जितेश रेड्डी, चंद्रशेखर डेकाटे, विवेक भोयर, विशाल रोकडे, मंगेश मेश्राम, प्रमोद देशभ्रतार, पंकज ठवकर यांनी सायबर टिमचे पोउपनि झिंगरे, नंदगिरी व त्यांचे पथकातील अंमलदार यांचे मदतीने केली.




**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नवीन कामठी :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १३.०९.२०२६ चे १४.१० वा. चे सुमारास, नवीन कामठी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, ईदगाह मैदानात एक पांढरा शर्ट व जिन्सपॅन्ट घातलेला इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव आशिष मुकेश मेश्राम वय २३ वर्षे रा. अंगुलीमाल बुध्द विहाराजवळ, कामगार नगर, कामठी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती ४००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे नवीन कामठी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १२.०९.२०२६ चे ०८.०० वा. ते १८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत प्लॉट क्र. २२, अष्टविनायक नगरी, गंगोत्री लॉनजवळ, नारा गाव, नागपूर येथे राहणारे फिर्यादी रामकुमार दशरथ पटेल वय ३० वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह वडीलांचे घरी भिमसेना नगर, जरीपटका येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील सोन्याचे वेगवेगळे दागिने व हातघडयाळ असा एकुण किंमती २,४२,८७०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. अक्षय ठाकरे यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे अजनी :—** कु. पायल जितेंद्र मानकर वय १९ वर्षे, रा. राहाटे नगर, टोळी, शेंद्रे किराणा स्टोअर्स जवळ, अजनी नागपूर ही दिनांक ०९.०९.२०२६ चे २३.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट १ इंच, डोळे—बारीक, केस—काळे लांब, अंगात— पांढरे ठिपके असलेली निळ्या रंगाची कुर्ती व निळया रंगाचा पायजामा घातलेला आहे. भाषा— मराठी बोलते.

**२) पोलीस ठाणे अजनी :—** राजु कचरु मदने वय ५२ वर्षे, रा. शक्ती चौक, दत्तात्रय मंदीरजवळ, घर क्र. २१९/२, ता.जि. छिंदवाडा, मध्यप्रदेश हे दिनांक ३०.०८.२०२६ चे ०४.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे अजनी हद्दीतील वसंत नगर, बाबुलखेडा रामेश्वरी, मानवता शाळेजवळ राहणारे रुपेश दुर्गे यांचे घरुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट ६ इंच, डोळे—काळे, केस—काळे पांढरे, अंगात— तपकिरी रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी बोलतात. ओळख— मानसिक रुग्ण आहेत.



कु. पायल



राजु

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**

**सहा.पोलीस निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**